# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि सत्यशोधक चळवळ

**दिनकर रावजी मुरकुटे**

*इतिहास विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे– १७.*

धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीमध्ये अनेक वर्षे दडपल्या गेलेल्या बहुजन व दलित समाजाच्या मुक्ततेसाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी २७ नोव्हेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. मानवाच्या समतेवर विश्वास घोषित करणारी आधुनिक महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय. उच्चवर्णियांच्या श्रेष्ठत्वाला व वर्चस्वाला धक्का देऊन सामाजिक समता प्रस्थापित करावयाची असेल तर चातुर्वर्ण्य पध्दती, जन्माधिष्ठित जातीव्यवस्था, धार्मिक रूढी, अनिष्ट चालीरीती नष्ट झाल्या पाहिजेत असा समग्र क्रांतीचा विचार म. फुल्यांनी व्यक्त केला.

सत्यशोधक समाज ही एक चळवळ होती. कोणतीही चळवळ एका व्यक्तीच्या सामर्थ्यावर वाढू शकत नसते. म्हणूनच ज्योतीराव फुले बरोबरच स्वामी रामय्या अय्यावारू, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. विश्राम रामजी घोले, धोंडीराम कुंभार, ज्ञानगिरी बुवा इत्यादी कार्यकर्त्यांचा सहभाग महत्वाचा आहे. त्यांनी केलेल्या कार्याची व मांडलेल्या विचारांची आपल्याला अद्याप पुरेशी आणि सुसंगत माहिती नाही. अलीकडे काही विद्वान अभ्यासकांचे लक्ष या उपेक्षित सत्यशोधकांच्या कार्याकडे गेले आहे. सत्यशोधक समाजातील पहिल्या पिढीतील कार्यकर्त्यांमध्ये कृष्णराव भालेकर (१८५०–१९१०) आणि गणपत सखाराम पाटील (१८६५ ते १८९२) यांचे कार्य प्रशंसनिय आहे. भालेकर हे मुकुंदराव पाटील यांचे जनक पिता होते. तर गणपतराव पाटील दत्तक पिता होते.

एकोणिसाव्या शतकाचा काळ महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा काळ होता. सर्व क्षेत्रांत या काळात आधुनिकतेचे बीज रुजले. परंपरेने बदलाचा ठाव घेतला आणि अनेक सामाजिक उलथा–पालथी घडून येऊ लागल्या. ब्रिटिशसत्तेच्या अंमलाखाली प्रशासकीय बदलांनी वेग घेतला. ब्रिटिशांनी नवी महसूल व्यवस्था, कायदेप्रशासन व्यवस्था, नवे सैन्य दल, पोलीस दल व नोकरशाही उभारुन प्रशासनाची पोलादी चौकट निर्माण केली. पोस्ट व टेलिग्राफ या सेवांचे जाळे विणून कार्यक्षम संदेशवहन यंत्रणा उभारली. रस्ते बांधून रेल्वेचा विस्तार करून कार्यक्षम व जलद दळणवळण यंत्रणा उभारली. नवी शिक्षणव्यवस्था प्रस्थापित केली. मुद्रणकलांचा सार्वत्रिक व सर्वदूर वापर करण्याचा प्रयत्न करून पाश्चात्य य ज्ञान व संस्कृतीचा प्रसार केला.[१] याचा परिणाम अनेक सामाजिक, धार्मिक संघटनांच्या माध्यमातून समाजसुधारकांनी जनजागृतीचे कार्य केले.

[१]) बगाडे उमेश (२०१४), 'महात्मा' जोतीराव फुले', श्रीगंधर्व वेद प्रकाशन, पुणे, पृ.क्र.१७.

डॉ. विश्राम रामजी घोले हे १८८५ ते १८८७ पर्यंत सत्यशोधक समाजाचे अध्यय होते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी भालेकरांचा 'दीनबंधू' चालवून मुंबई येथे कामगारांनी संघटना स्थापन करून त्यांच्या समस्या सोडविल्या. महझराष्ट्रातील ही पहिली कामगारांची चळवळ आहे. पहिल्या पिढीतील काही सत्यशोधकांचे कार्य अद्यापही अज्ञात आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे निधन २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाले, कृष्णराव भालेकर ७ मे १९१० रोजी दिवंगत झाले. डॉ. विश्राम घोले यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. नारायणराव लोखंडे यांचे निधन झाल्यामु 'दीनबंधू' पत्र बंद पडले. सत्यशोधकाची पहिली पिढी काळाच्या पडद्याआड गेली. त्यामुळे सत्यशोधक चळवळ हळूहळू निष्प्रभ होऊ लागली. समाज विस्कळीत झाला.

इ.स. १९१० नंतर या चळवळीने कात टाकून पुन्हा नवे रूप धारण केले. या दुसऱ्या पिढीत भास्करराव जाधव; 'दीनमित्र' कार मुकुंदराव पाटील; तरूण मराठा, 'कैवारी' आणि 'तेज' चे संपादक दिनकराव जवळकर, केशवराव जेधे, जागरुककरा वालचंद कोठारी, 'डेक्कन रयत' आणि 'प्रगती व जीनविजय' आण्णासाहेब लठ्ठे, केशवराव बागडे, 'जागृती' कार भगवंतराव पालेकर, 'विजयी मराठा' कार श्रीपतराव शिंदे, 'प्रबोधन' कार के. सी. ठाकरे, 'नवयुग' कार सीताराम बोले, माधवराव बागल, 'विश्वबंधू' कार बळवंतराव पिसाळ, हंटरकार खंडेराव बागल, 'गरीबांचा कैवारी' कार बाबूराव यादव, 'भगवा झेंडा' कार दत्ताजीराव कुटणे, इत्यादी कार्यकर्ते आणि वृत्तपत्रे यांच्या बहुमोल कामगिरीमुळे महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या प्रबोधनाचा प्रयत्न झाला, कोल्हापुरच्या छत्रपती शाहू महाराजांच्या उदार आश्रमामुळे शेतकरी वर्ग जागा झाला, कामगारांच्या संघटना उभ्या राहिल्या, सहकारी चळवळ सुरू झाली. शिक्षणाचा प्रसार गरीबांच्या झोपडीपर्यंत झाला. अनाथ व अपंगाच्या संस्था उभ्या राहिल्या, स्त्री मुक्ती संघटना, अस्पृश्य–आदिवासी यांच्या उन्नतीसाठी संस्था स्थापन झाल्या. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीस मदत होऊन त्याचा मोहरा बदलण्यास मदत झाली.

**राजर्षी शाहू महाराज आणि सत्यशोधक चळवळ**

बहुजन समाजाचे दूसरे महान नेते म्हणून फुल्यांनंतर राजर्षी शाह ूमहाराजांचा उल्लेख करावा लागतो. राजर्षी शाहू महाराज प्रजाहितदश राजे होते. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर लोककल्याण हा हेतू समोर ठेवून केला.

''सत्यशोधक समाजाशी राजर्षी शाहू महाराजांचा प्रथम संबंध केव्हा आला. याची निश्चित तारीख उपलब्ध नाही. परंतु त्या संबंधी काही अनुमान करता येते. राजर्षींचे एक प्रमुख सहकारी भास्करराव जाधव हे सत्यशोधक चळवळीतील एक प्रमुख नेते होते. भास्करराव जाधव यांनी महात्मा फुल्यांचे सहकारी स्वामी रामय्या अय्यावारू आणि प्रसिद्ध इतिहासकार कृ.अ.केळुसकर यांचा सहवास लाभला होता. त्यामुळे भास्कररावांनी या चळवळीची माहिती महाराजांना दिली असावी असे अनुमान करता येते. १९०१–०२ ला कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाला आरंभ झाला आणि त्यामुमे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे अस्तित्व पुन्हा जाणवू लागल्याची नोंद

न.र.फाटक यांनी आपल्या ''भारतीय राष्ट्रवादाचा विकास'' या ग्रंथात केली आहे.''[२] राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले नंतर गतप्राण झालेल्या सत्यशोधक चळवळीत प्राण फुंकण्याचे महत्वाचे कार्य केले. सामाजिक चळवळीत महात्मा फुल्यांप्रमाणे त्यांनी आपला ठसा उमटवला ते फुल्यांचे खरे साामजिक चळवळीचे वारसदार होते. त्यांनी बहुजन समाजाला संघटित करुन त्याला आपल्या हक्कांची जाणीव करुन दिली.

- **सत्यशोधक चळवळ :**

महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाच्या पुनरुज्जीवनाचे वारे सुरू झाले असता, कोल्हापूरसारखे बहुजन समाजाचे अस्वस्थ केंद्र त्यास अपवाद म्हणून राहणे शक्य नव्हते. सत्यशोधक समाजासारख्या चळवळीला खरी गती देण्याचे सामर्थ्य या केंद्रात मौजूद होते. वेदोक्ताच्या संघर्षामुळे ब्राह्मणशाहीशी सामना करण्याचे मानसिक धैर्य येथील कार्यकर्त्यात उत्पन्न झाले होते. भास्करराव जाधव, आण्णासाहेब लट्ठे या सारखे सत्यशोधकी बुद्धीवंत आणि बहुजनांचा कैवार घेणारे खुद्द छत्रपती शाहू महाराज यांच्या अस्तित्वाने कोल्हापूरची भूमी सत्यशोधक चळवळीच्या पुनरुज्जीवनास विलक्षण अनुकूल बनली होती. अशी परिस्थिती महाराष्ट्रात अन्यत्र कुठेच नव्हती.

दि. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात सत्यशोधक कार्यकर्त्यांची सभा होऊन 'श्री शाहू सत्यशोधक समाज' स्थापना करण्यात आली. सभेत भास्करराव जाधवांची अध्यक्ष म्हणून, अण्णासाहेब लठ्ठेयांची उपाध्यक्ष म्हणून महादेवराव डोंगरे यांची मुख्याधिकारी म्हणून तर हरिभाऊ चव्हाण यांची कार्यवाहक म्हणून निवड करण्यात आली. जाधव, लठ्ठे आणि डोंगरे हे सर्व संस्थानातील महत्वाच्या हुद्यावरील लोक होते.[३] कोल्हापूरातील सत्यशोधक नेत्यांनी आपल्या सत्यशोधक समाजाचे नाव 'श्री शाहू सत्यशोधक समाज' असे ठेवले होते. राजर्षी शाहू महाराजांचे नाव जरी सत्यशोधक समाजाला जोडले असले तरी त्यांची चळवळ पुढे 'सत्यशोधक चळवळ' या नावानेच प्रसिद्धीत आली.

- **शेती आणि विकास यांच्या विषयी विचार :**

हिंदुस्थानातील अन्य भागांप्रमाणे कोल्हापूर संस्थानातही बहुसंख्य प्रजाजन हे शेतकरीच होते. हा शेतकरी वर्ग अज्ञान व दारिद्र्य यांच्या गर्तेत खितपत पडलेला होता. त्यास अज्ञानामुळे सामाजिक मागासलेपण तर दारिद्र्यामुळे भौतिक मागासलेपण प्राप्त झालेले होते. अशा स्थितीत दुष्काळ आणि प्लेग यासारखी अस्मानी संकटे कोसळत तेव्हा या वर्गाची दैन्यावस्था पराकोटीस पोहचत असे. राज्यारोहणानंतरच्या आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पर्वातच शाहू महाराजांना या संकटाखाली आपली रयत भरडली जात असल्याचा कटू

२) मुकुंदराव पाटील स्मरणिका (१९९६), 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी अहमदनगर.

[३]) पवार जयसिंगराव (संपा.) , (२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पृ. १४०)

अनुभव घ्यावा लागला. त्यावेळी राज्यकर्ता या नात्याने दुष्काळाच्या कालखंडात प्रजेला अन्नधान्यांचा व त्यांच्या गुराढोरांना गवतचाऱ्याचा पुरवठा करून त्यांना मृत्यूचा तडाख्यातून वाचविण्याचे कर्तव्य महाराजांनी चोखपणे पार पाडले होते. पण एवढ्यावर त्याचे समाधान नव्हते. दुष्काळा सारख्या संकटावर कायमची मात करण्याची मूलभूत उपाययोजना करण्याचे त्यांनी मनावर घेतले. इ.स. १९०२ साली त्यांनी आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले.[४] त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. या खात्यामार्फत आपल्या संस्थानातील प्रत्येक गावाच्या पाटबंधाऱ्याची तपशीलवार पाहणी करण्यात आली.

नव्या जुन्या विहीरी, छोटेमोठे तलाव, लहानमोठे बंधारे या सर्वांच्या नोंदी करून त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नव्या विहिरी, नवे तलाव व छोट छोटे बंधारे यांच्या योजना तातडीने अंमलात आणल्या जाऊ लागल्या पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्त्रोत अडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो आणि या प्रयत्नांचा मुकुटमणी शोभेल अशी एक भव्य योजना महाराजांनी पुढे आणली. ती म्हणजे कोल्हापूरच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणाऱ्या धरणाची महत्वाकांक्षी योजना, जी पुढे कोल्हापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरलेली दिसून येते. आपल्या संस्थानात सुधारित शेतीचा प्रसार करण्यासाठी इ.स. १९१२ साली राजर्षी शाहूमहाराजांनी 'किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट'ही संस्था स्थापन केली. तिला जोडूनच कोल्हापूरात नवीन सुधारित अवजारे, बी, बियाणे, रासायनिक खते, आधुनिक मशागतीच्या पद्धती इ. चे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून आपल्या संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी 'शेतकी प्रदर्शने' भरवली जाऊ लागली.[५]

[४] ) (पवार जयसिंगराव, (२००१), पृ.१४०)

[५]) (पवार जयसिंगराव, (२००१), पृ.१४१.